**नियमित दिवाणी दावा क्र. १५१/२०२३**
**प्रगती कोल्हे वि. नारायण व इतर**

**<u>निशाणी क्र.५६ वरील आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.५ व ७ यांनी प्रस्तुतचा अर्ज म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचे म्हणणे थोडक्यात असे की, प्रतिवादी यांना दि. ०४. १०.२०२३ रोजी दाव्याचे समन्स व नोटीसची बजावणी झालेली आहे. परंतु सदर प्रतिवादी यांना दाव्यास कैफियत देणे कामी आवश्यक असणारी कागदपत्रे वादी यांच्याकडून समन्ससोबत दिलेली नाहीत. तसेच सर्व कागदपत्रे वेळेत उपलब्ध झालेली नव्हती. त्यामुळे प्रतिवादी यांना मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. प्रतिवादी यांना कैफियत व म्हणणे देण्यास २७८ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर विलंब प्रतिवादी यांनी जाणुनबुजुन केलेला नाही. प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे रेकॉर्डवर दाखल करुन न घेतल्यास या प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याचा आदेश होण्याकरीता दाखल केला आहे.

३. वादीने सदर अर्जास म्हणणे देवून अर्जास आक्षेप घेण्यात आले आहेत. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादींनी कायदयास अनुसरुन कैफियत/ म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. मी दाव्याचे तसेच कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी निरंतर मनाई करीता दाखल केला आहे. अर्जात नमूद कारण हे जरी संयुक्तिक वाटत नसले तरी प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाईकरीता असल्यामुळे त्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेकामी नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रस्तुतचा मंजूर होणे न्यायोचित ठरते. त्याचवेळी प्रतिवादींच्या वर्तनामुळे झालेला उशिर दुर्लक्षित करता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे

उचित ठरेल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र.५६ मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ५ व ७ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशिर माफ करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. ५ व ७ यांनी अर्जाचा खर्च रक्कम रु. ५,००/— वादीस द्यावा.

४. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

स्वाक्षरीत/—

दिनांक— ०५/०२/२०२५.

(पी.ए.आपटे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रेणापूर.